# FontFreedom GaMaBhaNa

# Frequently Asked Questions

## फॉन्टफ्रीडम गमभन २०१७
## या सॉफ्टवेअर बद्दल विचारण्यात येणारे प्रश्न

**Cybershoppee**
Chanakya, 3rd Floor,
Gokhale Road, Naupada,
Thane 400602 Maharashtra, India

Tel : (022) 25421185

E-mail : support@cybershoppee.com
Web :  www.fontfreedom.com / www.cybershoppee.com

---

**Version Release Date: 1 May 2017**

---

# फॉन्टफ्रीडम गमभन २०१७
# ह्या सॉफ्टवेअर बद्दल विचारण्यात येणारे काही प्रश्न

**फॉन्टफ्रीडम गमभन २०१७ :**
मराठी, हिंदी आणि संस्कृत  या भाषांमध्ये अत्यंत सुलभपणे काम करण्यासाठीचे हे सॉफ्टवेअर.

फॉन्टफ्रीडम खरेदी करण्यापूर्वी, इन्स्टॉल करताना तसेच वापरताना आपल्याला येणाऱ्या जवळपास सर्वच प्रश्नांची उत्तरे इथे देण्याचा प्रयत्न केलेला आहे. कृपया सपोर्टसाठी फोन करण्यापूर्वी खालील प्रश्नोत्तरे वाचा म्हणजे आपला बहुमुल्य वेळ वाचवू शकाल. आपल्याला पडलेल्या एखाद्या प्रश्नाचे उत्तर येथे नसल्यास आम्हाला जरुर विचारा. आपल्या कोणत्याही प्रश्नाचे स्वागतच असेल. आपल्या प्रश्नाचे उत्तर शक्य तितक्या कमी वेळात देण्याचा आम्ही प्रयत्न करु.

प्रश्न विचारण्यासाठी किंवा कोणत्याही प्रकारच्या मदतीसाठी www.fontfreedom.com या वेबसाईटवर असलेला ऑनलाईन फॉर्म भरा किंवा आम्हाला  support@cybershoppee.com  या पत्त्यावर इमेल पाठवा.

## सर्वसाधारण प्रश्न

**फॉन्टफ्रीडम गमभन २०१७ म्हणजे नेमके काय प्रकारचे सॉफ्टवेअर आहे?**

**फॉन्टफ्रीडम गमभन २०१७** हे देवनागरी लिपीमध्ये संगणकावर काम करण्यासाठी उपलब्ध असलेले सर्वात सोपे आणि किफायतशीर सॉफ्टवेअर आहे. देवनागरी लिपी वापरुन आपण हिंदी, मराठी आणि संस्कृत या भाषांमध्ये काम करु शकता. हे सॉफ्टवेअर वापरुन आपण एम एस ऑफिससारख्या कोणत्याही विंडोज आधारित सॉफ्टवेअरमध्ये देवनागरी लिपीत युनिकोडमध्ये असलेल्या कोणत्याही फॉन्टमध्ये किंवा मिलेनियम सिरिजच्या फॉन्टमध्ये काम करु शकता. सध्या बाजारात उपलब्ध असलेल्या इतर कोणत्याही देवनागरी सॉफ्टवेअरच्या तोडीसतोड असलेले हे सॉफ्टवेअर अत्यल्प किमतीत उपलब्ध आहे.

**फॉन्टफ्रीडम  विंडोजच्या कोणत्याही आवृत्तीमध्ये वापरता येते काय?**

**फॉन्टफ्रीडम गमभन २०१७**  विंडोज एक्सपी  पासून पुढच्या सर्व आवृत्तींमध्ये वापरता येते. विंडोज व्हिस्टाच्या पुढील आवृत्तींमध्ये हे इन्स्टॉल करण्याची पद्धत थोडी वेगळी आहे. ती पद्धत इन्स्टॉलेशन गाईडमध्ये दिली आहे.

**ह्या सॉफ्टवेअरचा विंडोज व्यतिरिक्त लिनक्स, मॅकिन्टॉश वगैरे प्रणांलींमध्ये उपयोग होऊ शकतो का?**

हे सॉफ्टवेअर विंडोजमध्येच वापरता येते. लिनक्स, मॅकिंन्टॉश वगैरे प्रणालींमध्ये या सॉफ्टवेअरचा उपयोग होऊ शकत नाही.

**फॉन्टस कुठे उपलब्ध आहेत ?**

युनिकोड आधारित फॉन्टस आता आपल्या संगणकावर विंडोजच्या नव्या आवृत्तींमध्ये थेटपणे इन्स्टॉल झालेले असतात. त्याशिवाय इंटरनेटवर अनेक युनिकोड फॉन्टस डाऊनलोडसाठी उपलब्ध आहेत.

आमच्या अनेक ग्राहकांकडे मिलेनियम फॉन्टसमधील मजकूर टाईप केलेला आहे. त्यांना तो मजकूर बघण्यासाठी आणि त्यात काम करण्यासाठी मिलेनियम सिरिजचे फॉन्टसुद्धा दिले आहेत. **फॉन्टस** फोल्डरमध्ये विविध फॉन्टस आहेत. आपण आवश्यकतेनुसार हे फॉन्टस इन्स्टॉल करु शकता. या फोल्डरमध्ये मिलेनिअम (Millennium) , आयएलडीव्ही (ILDV) , लॅन्गस्केप (Langscape) आणि इमेज (Image) अशी फोल्डर्स असून त्या त्या फोल्डरमध्ये फॉन्टस आहेत.

**फॉन्टस कसे इन्स्टॉल करायचे ?**

फॉन्टस फोल्डरमधील मिलेनिअम (Millennium) , आयएलडीव्ही (ILDV) , लॅन्गस्केप (Langscape) किंवा इमेज (Image) यापैकी हव्या त्या फोल्डरला डबलक्लिक केल्यास यामध्ये असलेल्या फॉन्ट फाईल्स आपल्याला दिसतील. विंडोजच्या कंट्रोल पॅनेलमधून फॉन्टस या फोल्डरमध्ये जाऊन आपण फॉन्टस इन्स्टॉल करु शकाल. अन्यथा या प्रत्येक फाईलला कॉपी करुन आपण विंडोजमधील फॉन्टस या फोल्डरमध्ये पेस्ट करु शकाल.

**मला माझ्या घरी आणि कार्यालयात दोन्ही ठिकाणी काम करावे लागते. मी हे सॉफ्टवेअर दोन्ही ठिकाणी इन्स्टॉल करु शकतो का?**

प्रत्येक डाउनलोड हा एकाच संगणकासाठी आहे. आपल्याला आपल्या घरी आणि कार्यालयात किंवा डेस्कटॉप पीसी आणि लॅपटॉप यावर सॉफ्टवेअर इन्स्टॉल करायचे असल्यास दोन लायसेन्स घ्यावी लागतील.

**हे सॉफ्टवेअर इंटरनेटवरुन डाऊनलोड करता येते का?**

होय. आपण हे सॉफ्टवेअर इंटरनेटवरुन डाऊनलोड करु शकता.

**मी इंटरनेटवरुन डाऊनलोड केलेली सेटअप फाईल अनेकजणांना दिल्यास त्यांना सॉफ्टवेअर वापरता येईल काय?**

**फॉन्टफ्रीडम गमभन २०१७** चा वापर करण्यासाठी आपल्याला नोंदणी करुन पर्सनल की नंबर (PKN) घेणे आवश्यक असते. आपण जोपर्यंत या सॉफ्टवेअरची नोंदणी आमच्याकडे करत नाही तोपर्यंत आपण हे सॉफ्टवेअर पूर्ण क्षमतेने वापरु शकणार नाही. आपण डाउनलोड केलेली फाईल इतरांना दिल्यास त्यांनाही नोंदणीशिवाय या सॉफ्टवेअरचा वापर करता येणार नाही. सॉफ्टवेअरचे पैसे भरल्याशिवाय नोंदणी होत नाही.

**हे सॉफ्टवेअर डि.टि.पी. च्या कामासाठी वापराता येईल का ?**

हे सॉफ्टवेअर डि.टी.पी.च्या कामासाठी वापरता येते. मात्र आपण पेजमेकर, फोटोशॉप, कोरल ड्रॉ, क्वार्क एक्सप्रेस यासारखी सॉफ्टवेअर वापरत असाल तर त्यात युनिकोड टायपिंगचा सपोर्ट नाही. यासाठी आपण मायक्रोसॉफ्ट ऑफिसमध्ये असलेल्या पब्लिशर या सॉफ्टवेअरचा वापर करु शकता.

डिटीपी सॉफ्टवेअरमध्ये काम करण्यासाठी आपण मिलेनियम सिरिजचे फॉन्टस वापरु शकता. युनिकोड आणि मिलेनियम या दोन्ही प्रकारच्या फॉन्टसाठी आपण इंग्लिश फोनेटिक हा किबोर्ड वापरु शकता.

**हे सॉफ्टवेअर एम.एस.ॲक्सेस, एक्सेल, पॉवरपॉइंट, पब्लिशर ह्या सॉफ्टवेअरमध्ये वापरता येईल का?**

**फॉन्टफ्रीडम गमभन** २०१७ वर उल्लेखलेल्या सर्व सॉफ्टवेअरमध्ये वापरता येईल.

**हे सॉफ्टवेअर पेजमेकर, कोरल ड्रॉ, फोटोशॉप, फ्लॅश, ड्रिमविव्हर, फायरवर्क्स वगैरे सॉफ्टवेअरमध्ये वापरता येईल का?**

**फॉन्टफ्रीडम गमभन २०१७** वर उल्लेखलेल्या बहुतांश सॉफ्टवेअरमध्ये वापरता येते. कोणत्या सॉफ्टवेअरमध्ये काम करताना आपल्याला अडचण आल्यास कृपया आम्हाला कळवावे म्हणजे आपल्याला ती अडचण सोडवण्यासाठी आम्ही मदत करु.

**ग्राफिक डिझायनिंग आणि वेब पेज डिझायनिंग ह्या कामांसाठी ह्या सॉफ्टवेअरचा उपयोग करता येईल का?**

हे सॉफ्टवेअर ग्राफिक डिझायनिंग आणि वेबपेज डिझायनिंग ह्या कामांसाठी वापरता येऊ शकते. युनिकोड फॉन्ट वापरता येणाऱ्या कोणत्याही सॉफ्टवेअरमध्ये आपण वेब डिझायनिंग करु शकता. ग्राफिक डिझायनिंगसाठीआपण युनिकोड किंवा मिलेनियम यातील कोणताही फॉन्ट वापरु शकता.

**ह्या सॉफ्टवेअरमध्ये किती किबोर्ड लेआऊट वापरता येतात ?**

मराठीमध्ये काम करण्यासाठी अनेक प्रकारचे कीबोर्ड वापरले जातात. ज्याच्या त्याच्या सोयीनुसार हे कीबोर्ड वापरले जातात. **फॉन्टफ्रीडम गमभन २०१७** मध्ये इंग्लिश फोनेटिक आणि गमभन या किबोर्ड लेआऊटसचा समावेश आहे. आपल्या

सोयीनुसार आणि गरजेनुसार आपण कोणताही कीबोर्ड लेआऊट वापरु शकाल आणि तो केव्हाही बदलून दुसराही वापरु शकाल.

**किबोर्डचे स्टिकर उपलब्ध होतील का?**

अशा प्रकारचे स्टिकर्स आता वापरले जात नाहीत कारण या स्टिकर्समुळे आपला किबोर्ड खराब होऊ शकतो.

**फॉन्टफ्रीडम गमभन २०१७ माझ्या कार्यालयातील नेटवर्कवर वापरता येईल काय?**

**फॉन्टफ्रीडम गमभन २०१७** हे केवळ एका संगणकावर वापरण्याचे सॉफ्टवेअर आहे. हे नेटवर्कवर चालत नाही. आपल्याला आपल्या नेटवर्कवर याचा वापर करायचा असल्यास प्रत्येक संगणकावर वेगवेगळे सॉफ्टवेअर इन्स्टॉल करावे लागेल.

**फॉन्टफ्रीडम गमभन २०१७ मध्ये मराठी व्यतिरीक्त आणखी किती भाषांमध्ये टाईप करता येते ?**

ह्या सॉफ्टवेअरमध्ये मराठी व्यतिरीक्त ७ भारतीय भाषांमध्ये टाईप करता येते. मराठी, हिंदी आणि संस्कृत व्यतिरिक्त भाषांमध्ये काम करण्याची सोय प्रायोगिक तत्त्वावर दिली असून यापुढील आवृत्तींमध्ये ती नियमित करण्यात येणार आहे. या भाषांमध्ये टायपिंग करताना आपल्याला काही अडचणी आल्यास आम्हाला कळवावे.

## मराठी इ-मेल विषयी प्रश्न आणि त्यांची उत्तरे

**मी ह्या सॉफ्टवेअरचा वापर करुन मराठीतून इ-मेल पाठवू शकतो काय?**
होय. आपण **फॉन्टफ्रीडम गमभन २०१७** वापरुन gmail किंवा इतर कोणत्याही साईटवरुनही मराठीतून मेल पाठवू शकता.

**मी ह्या सॉफ्टवेअरचा वापर करुन आऊटलुक एक्सप्रेसच्याद्वारे मराठीतून इ-मेल पाठवू शकतो काय?**
आपण **फॉन्टफ्रीडम गमभन २०१७** वापरुन थेट आऊटलुक एक्सप्रेसमध्ये वापरुन मराठी इमेल तयार करु शकता आणि ते कोणालाही पाठवू शकता.

**मराठी इ-मेल बरोबर फॉन्ट पाठविण्याची आवश्यकता आहे का?**
आपण **फॉन्टफ्रीडम गमभन २०१७** वापरुन युनिकोडमध्ये इ-मेल पाठवल्यास आपल्याला फॉन्ट पाठविण्याची गरज नाही.

**फॉन्टफ्रीडम गमभन २०१७ वापरुन मी फेसबुकवर लिहू शकतो का?**
होय. **फॉन्टफ्रीडम गमभन २०१७** वापरुन आपण फेसबुकवर मराठीत लिहू शकता.

**फॉन्टफ्रीडम गमभन २०१७ वापरुन मी माझ्या ब्लॉगवर लिहू शकतो का?**
होय. **फॉन्टफ्रीडम गमभन २०१७** वापरुन आपण आपल्या ब्लॉगवर मराठीत लिहू शकता.